# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 17/06/2020 (बुधवार)
(सकाळ)

### घरफोडी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 28 कि.मी अंतरावर मौजा कळमना येथे दिनांक 15/06/2020 ते दिनांक 16/06/2020 चे 22:00 वा. ते 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गोविंदराव नारायण आचार्य, वय 27 वर्ष, रा. कळमना ता. जि. नागपूर यांचे मकानाचे कुलूप अज्ञात आरोपीने तोडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटामध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने किमती 15,000/–रू. व नगदी 30,000/–रू. तसेच मटक्यामध्ये ठेवलेले अंदाजे 5,000/– रू. असा एकुण कि. 50,000/–रू.चा मुददेमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि थिटे पो. स्टे. कुही 9623857068 हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :– डिसेबंर 2017 ते दिनांक 10/06/020 चे सकाळी 05.00 वा. दरम्यान 18 वर्षीय पिडीत/फिर्यादी हीची आई मरण पावल्यामुळे ती तिच्या मोठी आई यांच्या कडे राहण्यास गेली होती. दरम्यान आरोपी नामे– बबन महागु पुरामे, वय 48 वर्ष, रा. मंगळवारी उमरेड याने माहे डिसेंबर 2017 मध्ये पिडीतेला रात्री दरम्यान तिचे जवळ जाऊन तिच्याशी जबरीने वारंवार शारीरिक सबंध केले. त्यामुळे पिडीता गरोदर राहिली असता तिने गरोदर असल्या बाबतची माहीती तिच्या मोठी आई हिला सांगीतले असता आरोपीने व आरोपीची पत्नी यांनी संगनमत करून तिला घरीच गर्भपाताच्या गोळया देवुन तिचा गर्भपात घडवुन आणला. तसेच त्यानंतर आरोपीने पुन्हा पिडीतेस स्पर्श करून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पिडीतेने नकार दिला असता तिला अश्लिल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. तरी पिडीतेला हा त्रास असहय झाल्याने तिने ही गोष्ट आपल्या वडीलांना फोन दवारे सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376(2)(एन)(एफ) 3, 294, 506 भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक श्री. सोनाली राठोड 7038583989 या करीत आहे.

# विनयभंग

1) पो.स्टे. बेला :– दि. 16/06/2020 चे 12:30 वा. सुमारास 25 वर्षीय फिर्यादी/पीडित हि आपल्या लहान मुलासह बाजेवर झोपली असतांना आरोपी नामे– प्रमोद काळसर्पे, रा. बोरगाव (लांबट),तह. उमरेड जि. नागपूर याने घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 354, 452 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध धेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा श्याम मरस्कोल्हे 9673733263 हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– दि. 15/06/2020 चे 04:00 वा. सुमारास 49 वर्षीय फिर्यादी/पीडिता हि घरी एकटी हजर असतांना आरोपी नामे– जगन नामदेवराव ढोणे, वय 34 वर्ष, रा. महेंदी ता. नरखेड जि. नागपूर याने 'मला ताप आहे पॅरासिटमल गोळी दे' असे म्हणुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. दरम्यान पीडितेचे पती आले त्यास पीडिता सदर बाब सांगत असतांना आरोपीने दोघांना शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 452, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सोनवणे 7798801816 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर